प्रहार
www.prahaar.in
epaper.prahaar.in

सिंधुदुर्ग
शनिवार २४ डिसेंबर, २०२२

# हवामानातील बदल ओळखून शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविण्याची गरज : कुलगुरू डॉ. संजय सावंत

## 'हवामान बदल आणि भारतीय शेती' विषयावर दोन दिवसीय आंतरविद्या चर्चासत्र

दोडामार्ग (प्रतिनिधी)

हवामान बदलाचा दिवसेंदिवस शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. असे असले तरी या बदलाला सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भविष्यात शेतकऱ्यांनी शेतातील उत्पादन वाढविणे गरजेचे आहे असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी केले.

दोडामार्ग येथे नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या अर्थशास्त्र विभागाच्यावतीने आयसीएसएसआर मुंबई पुरस्कृत "हवामान बदल आणि भारतीय शेती" या विषयावर आंतरविद्या दोन दिवसीय चर्चासत्र संपन्न झाले. (पान २ वर)



दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयातील दीपप्रज्वलन करताना कुलगुरु डॉ. संजय सावंत, सोबत विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व अन्य. छाया सुहास देसाई

### शेतीला उद्योगाची जोड देण्यासाठी दृष्टिकोन बदलणे गरजेचे : डॉ. संजय भावे

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. संजय भावे यांनी सांगितले की आपला शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. शेतीला जर आपण इतर उद्योगाची जोड दिल्यास व पूर्णवेळ शेती केल्यास त्याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक यांनी महाविद्यालयात होणाऱ्या सांस्कृतिक विविध उपक्रमासाठी स्टेज तयार करून दिल्याबद्दल त्यांचा कुलगुरूंच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. यु. दरेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय खडपकर, तर आभार डॉ. सोपान जाधव यांनी मानले. या समारंभासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे संशोधक सहायक डॉ. कस्तुरे, वेगवेगळ्या महाविद्यालयाचे प्रतिनिधी, तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.